# गुरोः कृपाप्रसादेन आत्मारामं निरीक्षयेत्

## श्रीगुरूंच्या कृपाप्रसादाद्वारे आत्मानंदाची अनुभूती करा[१]

३ जुलै, २०१७

प्रिय साधक,

गुरुपौर्णिमेच्या महिन्यासाठी अनेकानेक शुभेच्छा!

सर्वप्रथम, आकाशाच्या घुमटावर प्रवास करणाऱ्या गुरुपौर्णिमेच्या चंद्राचे फोटो पाठवण्याकरता, तुम्हाला धन्यवाद देतो. प्रत्येक छबी अतिशय सुंदर आहे!

या वर्षी गुरुपौर्णिमेच्या चंद्राचा शुक्लपक्ष २४ जूनला, गुरुमाईंच्या जन्मदिवशी सुरू झाला होता आणि तो निरंतर त्याच्या परिपूर्णतेच्या दिशेने वाढत जातो आहे, प्रकाशाचे एक पूर्ण वृत्त बनत जातो आहे. यद्यपि, वर्षातील कोणत्याही वेळी, चंद्राची कोणतीही अवस्था मनोहर असते, तरीदेखील, सिद्धयोग मार्गावर आपल्यासाठी गुरुपौर्णिमेचा चंद्र हा विशेषत्त्वाने मोहक असतो, मुख्यतः या कारणाने की, त्याचे आपल्या साधनेत गूढ आणि दैवी महत्त्व आहे.

भारतीय शास्त्रग्रंथांमध्ये, गुरुपौर्णिमेच्या चंद्राला संपूर्ण वर्षातील सर्वाधिक तेजोमय पूर्ण चंद्र म्हटले आहे. आधुनिक विज्ञानही असेच म्हणते — की, या काळात चंद्र रात्रीच्या आकाशात सर्वात अधिक उंच आणि अधिक दीप्तीमान असतो, जसे भारतातून आणि उष्णकटिबंधातील प्रदेशांमधून पाहिले गेले आहे. सहस्त्रावधी वर्षांपूर्वी, महर्षि वेदव्यास यांच्या शिष्यांनी, श्रीगुरूंच्या आदराप्रित्यर्थ समर्पित दिवस म्हणून आषाढ महिन्यातील या पौर्णिमेची निवड केली होती. आपल्या श्रीगुरूंकडून प्राप्त झालेल्या आध्यात्मिक जागृतीप्रति आणि अपरिमित प्रज्ञानाप्रति कृतज्ञता अर्पण करण्याची हीच त्यांची रीत होती.

सिद्धयोग मार्गावर आपण, गुरुमाई चिद्‌विलासानंद, बाबा मुक्तानंद आणि भगवान नित्यानंद यांच्या शिष्यांनी, ही परंपरा सुरू ठेवली आहे. गुरुपौर्णिमेच्या या महिन्यादरम्यान आपण, सिद्धयोग गुरूंकडून प्राप्त झालेली शक्तिपात दीक्षा तसेच कृपा, शिकवणी आणि आशीर्वाद यांचे मोल जाणून घेत त्यांच्याप्रति आपली कृतज्ञता व्यक्त करण्याचा अभ्यास करतो.

‘एक मधुर सरप्राईझ्’ सत्संग २०१७मध्ये, गुरुमाईंनी आपल्या संदेशात अकरा शिकवणी आपल्याला प्रदान केल्या, जेणेकरून आपले अध्ययन आणि अभ्यास यांत आपल्याला मार्गदर्शन प्राप्त व्हावे. या वर्षातील प्रत्येक महिन्यात, आपण यांपैकी एकेका शिकवणीवर आपले लक्ष केंद्रित करत आहोत. जुलै महिन्यासाठी असलेली शिकवण आहे,

‘आपल्या प्रयत्नाचे महत्त्व जाणा.’

प्रयत्न महत्त्वाचा का आहे, विशेषतः सिद्धयोग साधनेमध्ये? याविषयी थोडासा विचार करा. एखाद्या गोष्टीत खरोखर निपुण होण्यासाठी — त्या गोष्टीला पूर्णपणे तुमच्या अस्तित्वाचा एक असा भाग बनवण्यासाठी, की जेणेकरून तुमचे जीवन स्वाभाविकपणे त्याचे सौंदर्य आणि प्रज्ञान व्यक्त करू शकेल — तुम्हाला त्या गोष्टीचा अविरत आणि विचारपूर्वक सराव करावा लागेल. निपुणता प्राप्त करण्याकडे जाणाऱ्या यात्रेत तुम्हाला समर्पण आणि वचनबद्धता यांची आवश्यकता आहे. जेव्हा तुम्ही असा प्रयत्न करता, तेव्हा तुम्ही सत्याला किंवा कौशल्याला तुमच्या अस्तित्वात इतक्या खोलवर घट्ट जोडता की, तुम्ही त्याची एक जिवंत अभिव्यक्ती बनता. एका क्षणासाठी अशी कल्पना करा की, गुरुमाई आपल्या संदेशात जी शिकवण देतात, तसे जर तुम्ही अभिव्यक्त झालात, तर तुम्हाला ते कसे भासेल? प्रयत्न एक उत्कृष्ट ध्येय आहे आणि ते एक असे ध्येय आहे, जे आपल्या सर्वांच्या आवाक्यात आहे.

काही दिवसांपूर्वी, श्री मुक्तानंद आश्रमात झालेल्या एका सत्संगात, एका व्हिजीटींग सेवाकर्तीने एक असा अनुभव सांगितला, जो एकाग्रतेने केलेल्या प्रयत्नाच्या सामर्थ्याचे अतिशय सुंदर स्पष्टीकरण देतो. त्या सेवाकर्तीने सांगितले की, नुकतेच, तिने आणि तिच्या बहिणीने कुटुंबात निर्माण झालेल्या एका आव्हानात्मक परिस्थितीत, आशीर्वादांसाठी प्रार्थना करण्याच्या उद्देशाने, गुरुगीतेचा पाठ करायचे ठरवले. तिच्या बहिणीने हा पाठ पूर्वी नियमितपणे केला होता, परंतु तसे करायला आता तीन दशकांहूनही अधिक काळ उलटून गेला होता. त्या सेवाकर्तीला असे वाटले की, तो पाठ कसा वाचायचा हे आता तिच्या बहिणीला आठवणार नाही. त्यांनी जेव्हा पाठ वाचायला सुरुवात केली, तेव्हा ती सेवाकर्ती हे पाहून अतिशय आश्चर्यचकित झाली की, तिची बहीण एका पाठोपाठ एक, प्रत्येक श्लोक स्पष्ट उच्चारणासह वाचत जात होती! त्या सेवाकर्तीला हे लक्षात आले की, तिच्या बहिणीने तीन दशकांपूर्वी केलेले प्रयत्न तिच्या अस्तित्वात इतके खोलवर रुजलेले होते की, जेव्हा तिला

गुरुगीतेचे श्लोक वाचायचे होते, तेव्हा ते प्रयत्न तिच्यासाठी अगदी सहजगत्या उपलब्ध होते. तिच्या बहिणीने तिला नंतर सांगितले की, ती जसजसे ते श्लोक गात गेली, तसतसा तिला त्या स्वाध्यायाशी, गुरुगीतेच्या पवित्र मंत्राशी असलेला तोच गहिरा संबंध जाणवला, जो तिच्या युवावस्थेत तिने अनुभवला होता. अनेक वर्षांपूर्वी तिने केलेले प्रयत्न, आतादेखील अव्याहतपणे फलीभूत होत होते.

शिवसूत्र, जो काश्मीर शैवमताचा दैव-प्रेरित शास्त्रग्रंथ आहे, आपल्याला प्रयत्नाचा एक अन्य दृष्टिकोन प्रदान करतो :

**उद्यमो भैरवः**

उद्यम [प्रयत्न] हाच भैरव आहे.[२]

दुसऱ्या शब्दांमध्ये सांगायचे झाले तर, आनंद, दीप्तिमान प्रशांती आणि अन्य सर्व सद्‌गुण जे भैरवाचे म्हणजेच भगवान शिवाचे आहेत — आता आपल्याला प्राप्य आहेत. आपल्याला आपल्या अभ्यासाच्या फायद्याचा अनुभव घेण्यासाठी, साधनेच्या लक्ष्याप्रत पोहोचण्यापर्यंत वाट पाहाण्याची आवश्यकता नाही. ध्यानाचा प्रत्येक क्षण, मंत्रगान करण्याचा प्रत्येक क्षण, प्रत्येक तो क्षण ज्यात आपण संपूर्णतेने आणि नैसर्गिकपणे श्वास घेतो, तो एक पवित्र क्षण आहे, एक सुंदर आणि उन्नत करणारा क्षण आहे. आणि ही आपली सर्वश्रेष्ठ जबाबदारी आहे की, या क्षणांची पवित्रता आपण जाणावी आणि त्यांचा जास्तीत जास्त फायदा करून घ्यावा. गुरुमाई आपल्याला शिकवण देतात की, आपल्या साधनेतील लक्ष्यापर्यंत आपण केवळ कृपेच्या माध्यमातूनच पोहोचत नाही; आपला स्वप्रयत्न आवश्यक आहे. कृपा स्वप्रयत्नामध्ये निहित असते आणि स्वप्रयत्न कृपेला आकर्षित करतो. यामुळेच, जसे की शिवसूत्रात म्हटले आहे, “प्रयत्नच भैरव आहेत.”

मी तुम्हाला गुरुमाईंचे जन्मदिवस प्रवचन, ‘कल्याणकारी सहचर’ वाचण्यासाठी प्रोत्साहित करतो, ज्यात तुम्ही आपल्या श्वासाच्या सामर्थ्याचे अन्वेषण कसे करावे, हे शिकाल. गुरुमाईंच्या संदेशाचा अभ्यास करण्याच्या तुमच्या प्रत्येक प्रयत्नासह, तुम्ही आपल्या अस्तित्वातच परमेश्वर असल्याचा अनुभव बळकट करता.

मी तुम्हाला एक गोष्ट सांगू इच्छितो, जी थोड्या दिवसांपूर्वीच मला श्री मुक्तानंद आश्रमात एका व्हिजीटींग सेवाकर्तीने सांगितली आहे; ती सेवाकर्ती माझी मैत्रीण आहे आणि आम्हा दोघांना

फोटोग्राफी करणे प्रिय आहे. ती एस.वाय.डी.ए. फाउंडेशनच्या मल्टीमीडिया विभागात फोटोग्राफर म्हणून सेवा अर्पण करते आणि तिने काढलेल्या अनेक फोटोंचा सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवरदेखील समावेश केला गेला आहे.

एके दिवशी संध्याकाळी, ही सेवाकर्ती वेबसाईटसाठी फोटो काढत होती. अनुग्रह भवनातील अमृत कोर्टयार्डमध्ये फोटो काढत असताना जेव्हा तिने ऐकले की, गुरुमाई तिला तिच्या नावानिशी हाक मारत आहेत, तेव्हा तिला खूपच आनंद झाला. ती वळली, तेव्हा तिला दिसून आले की, गुरुमाई कोर्टयार्डमध्ये उभ्या आहेत. गुरुमाईंनी तिला आपल्याजवळ बोलावत, काहीतरी बघायला सांगितले. गुरुमाईंनी, कसा मावळतीला जाणाऱ्या सूर्याचा स्वर्णिम त्या संपूर्ण कोर्टयार्डमध्ये पसरला होता आणि त्याच्या मार्गात येणाऱ्या प्रत्येक वस्तूला प्रकाशित करत होता, याकडे तिचे लक्ष वेधले. त्या प्रकाशाच्या प्रभावळीने प्रत्येक पान, देठ आणि पाकळी अंकित होत होती.

त्यानंतर, गुरुमाईंनी त्या सेवाकर्तीला काही फुलांचे फोटो घेण्यास सांगितले, जी फुले त्या तेजस्वी प्रकाशाने उजळून निघाली होती. त्या सेवाकर्तीने छायाचित्र काढल्यानंतर, गुरुमाईंनी ते फोटो पाहायला मागितले. सेवाकर्तीने कॅमेरा गुरुमाईंकडे दिला. कॅमेऱ्यातील व्ह्यूफाइंडरमध्ये तो फोटो पाहिल्यानंतर, गुरुमाईंनी कॅमेरा पुन्हा त्या सेवाकर्तीच्या हवाली करत तिला सांगितले की, जी गोष्ट फोटोग्राफरने पाहावी असे त्यांना वाटत होते, ती पकडण्यात फोटोग्राफर असमर्थ ठरली होती.

त्या सेवाकर्तीने पुन्हा एक प्रयत्न केला. फोटो घेण्याआधी तिने अगदी काळजीपूर्वक त्या कॅमेऱ्याच्या लेन्सला फोकस केले आणि दृश्य जसे होते, तसेच ते फोटोत घेण्यासाठी शॉट तयार केला. यावेळी, तिने अगदी योग्य पद्धतीने फुलांवर चमचमणारी प्रकाशाची कोमल प्रभा कॅमेऱ्यात पकडली.

त्याच वेळी, एक दुसरा सेवाकर्ता त्या कोर्टयार्डमधून जात होता. गुरुमाईंनी, प्रकाशाने चमकणाऱ्या त्या सेवाकर्त्याच्या चेहऱ्याकडे फोटोग्राफरचे लक्ष वेधले. फोटोग्राफरने फोटो काढला आणि कॅमेरा गुरुमाईंकडे दिला. गुरुमाईंनी फोटो पाहिल्यानंतर, सहमतीदर्शक मान डोलावली. आणि कॅमेरा त्या सेवाकर्तीच्या हातात परत दिला.

या विलक्षण संवादानंतर, गुरुमाईंनी जे शिकवले होते, त्यावर त्या फोटोग्राफरने चिंतन केले. गुरुमाईंनी या सेवाकर्तीचे डोळे उघडले होते आणि तिला हे दाखवून दिले होते की, आपल्या लेन्सला कुठे आणि कसे  फोकस करायचे आहे, जेणेकरून ती कॅमेऱ्याच्या लेन्सच्या माध्यमातून सूर्यप्रकाशाच्या सौंदर्याला अजरामर करू शकेल. आणि त्याचवेळी, त्या फोटोग्राफरने या संवादात एक गहन अर्थसुद्धा पाहिला.

ती हे शिकली की, योग्य प्रयत्न केल्याने — आपल्या जागरूकतेमध्ये परिवर्तन केल्याने आणि जागरूकतेला केंद्रित केल्याने — ती त्या चमचमत्या प्रकाशाला, तेजस्वीतेच्या क्षणाला ग्रहण करू शकली आणि आपल्या फोटोग्राफ्सच्या माध्यमातून ते क्षण तिने काळाच्या दुमडींमध्ये सर्वांच्या फायद्यासाठी कोरून ठेवले.

संपूर्ण जुलै महिन्यात, तुम्ही श्रीगुरूंचा आदर करत असताना, गुरुपौर्णिमेचा उत्सव साजरा करताना, सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवर श्री मुक्तानंद आश्रम आणि विश्वभरातील, कलेकलेने वाढत जाणाऱ्या चंद्राची विलक्षण दृश्ये प्रकाशित होत राहतील. तुम्ही जर अद्यापही फोटो काढला नसेल, तर मी तुम्हाला गुरुपौर्णिमेच्या चंद्राचे फोटो पाठवण्यासाठी प्रोत्साहित करतो.

या मंगल समयादरम्यान मी तुम्हाला आमंत्रित करतो की, तुम्ही सिद्धयोग मार्गावरील मुख्य अभ्यास, दक्षिणा यांच्याशी स्वतःला जोडावे आणि त्यांना नवीनतम करावे. दक्षिणा, हा सिद्धयोग मार्गावरील मुख्य अभ्यास आहे ज्याचे पालन आपण गुरुपौर्णिमेच्या महिन्यात करतो. माझ्या असे लक्षात आले आहे की, दक्षिणा अर्पण करणे हा गुरुमाईंच्या माझ्या जीवनात असलेल्या उपस्थितीसाठी माझी असीम कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक अर्थपूर्ण आणि हार्दिक मार्ग आहे. या अभ्यासाच्या आपल्या अनुभवाविषयी सांगण्यासाठी माझ्याकडे खूप काही आहे. परंतु, आताकरता, मी तुम्हाला प्रोत्साहित करतो की, तुम्ही ‘गुरुपौर्णिमेच्या सन्मानाप्रित्यर्थ सिद्धयोग स्वामींद्वारे आमंत्रण’ आणि ‘एक सिद्धयोग अभ्यास दक्षिणा पर व्याख्या’ हे वाचावे.

श्रीगुरूंचा हा महिना तुम्ही त्याच्या संपूर्णतेत कसा साजरा करू शकता, याविषयी आणखी अधिक शिकण्यासाठी, कृपया वेबसाईटवर गुरुपौर्णिमा २०१७ ही मिनीसाईट पहा.

पुनश्च एकदा, तुम्हाला गुरुपौर्णिमेच्या महिन्यासाठी शुभेच्छा. या महिन्यात तुम्ही पुन्हापुन्हा त्या अनेक उत्कृष्ट मार्गांना जाणावे, ज्यांच्याद्वारे श्रीगुरूंची कृपा तुमच्या जीवनात प्रवाहित होते, या शुभकामनेसहित.

सप्रेम,

पॉल हॉकवुड

१ शीर्षक श्रीगुरुगीतेतून घेतले आहे, श्लोक ११०; इंग्रजी भाषांतर © २०१७ एस.वाय.डी.ए. फाउंडेशन

२ शिवसूत्र १.५ : स्वामी मुक्तानंद यांच्याद्वारे व्याख्या, *Nothing Exists That Is Not Shiva* [साउथ फॉल्सबर्ग, न्यूयॉर्क : एस.वाय.डी.ए. फाउंडेशन, १९९७] पृ. १०